पोलीस उप आयुक्त (मुख्यालय),
मिरा-भाईदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय
कार्यालयाचा पत्ता-सेक्टर ५, रामनगर, शांतीगार्डन, मिरा-रोड (पुर्व),
ठाणे.४०११०७ फोन नंबर-०२२-२९४५१००
E-mail:-dcphq.mb-vv@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा. क्र.- पोउपआ(मुख्या)/गणपती उत्सव/अवजड वाहन डायव्हर्जन/अधिसूचना- ४८३/२०२२ दि.३१/०८/२०२२

## गणपती उत्सवानिमीत्त मिरा-भाईदर, वसई-विरार, पोलीस आयुक्तालयाच्या हद्दितील राष्ट्रीय महामार्ग क्र. ४८ वर वाहतूक कोंडी होऊ नये म्हणून वाहतूक नियंत्रण अधिसूचना

---

**ज्याअर्थी** काशिमीरा वाहतूक विभाग, परिमंडळ-१ चे प्रभारी अधिकारी यांनी आमचे असे निदर्शनास आणुन दिले आहे की, ठाणे शहरातील ठाणे ते घोडबंदर रोड (राष्ट्रीय महामार्ग क्र. ४८) लगत गायमुख येथे चौपाटी व गणेश घाट असून सदर ठिकाणी मोठया संख्येने गणपती विसर्जन होणार आहे. या दिवशी गणेश मुर्ती विसर्जन संपेपर्यंत वरसावे बाजूकडून येणाऱ्या अवजड वाहनांना विसर्जन संपेपर्यंत ठाणे बाजूकडे जाण्यासाठी गायमुख पासून ठाणे शहर पोलीसांकडून प्रतिबंध घालण्यात आला आहे. याकरीता **पोलीस आयुक्त ठाणे शहर यांनी त्यांचेकडील जा.क्र. पोउपा/शवाशा/ प्रशा-१/७७/२०२२, दिनांक-२९/०८/२०२२ अन्वये अधिसूचना पारीत केलेली** आहे. यामुळे वरसावे बाजूकडून येणाया राष्ट्रीय महामार्ग क्र. ४८ वर गणपती विसर्जनाच्या वेळेस गायमुखपासून वाहनांच्या मोठया रांगा लागून मोठया प्रमाणात वाहतूक कोंडी होणार आहे. यामुळे इतर लहान वाहने, अत्यावश्यक सेवेतील वाहने, ॲम्बुलन्स, व्हिआयपी कॅनवाय इ. अडकून बसून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता आहे.

**ज्याअर्थी** गणपती विसर्जनाच्या दिवशी गायमुखपासून राष्ट्रीय महामार्ग क्र. ४८ वरील ठाणे बाजूकडे जाणारी अवजड वाहने थांबवल्याने होणारी संभाव्य वाहतूक कोंडी टाळणे आवश्यक झाले आहे. याकरीता गणपती विसर्जनाचे दिनांक- ०१/०९/२०२२, दि. ०४/०९/२०२२, दि. ०५/०९/२०२२, दि. ०६/०९/२०२२ व दि. ०९/०९/२०२२ रोजी सकाळी ०५.०० वा. ते गणेशमुर्ती विसर्जन मिरवणूक संपेपर्यंत प्रवेश बंद करणे तसेच दिनांक ३१/०८/२०२२ ते ०९/०९/२०२२ याकालावधीत गणपती विसर्जन दिवस सोडून इतर दिवशी जड -अवजड वाहनांना रात्रौ. २१.०० वा. ते सकाळी ०५.०० वाजेपावेतो वाहतूकीस मुभा देणे आवश्यक झाले आहे. प्रवेशास बंद केलेल्या कालावधीमध्ये पालघर - वसई बाजूकडून येणारी अवजड वाहनांना खालील मार्गाने वळवल्यास संभाव्य वाहतूक कोंडी होणार नाही.

१) शिरसाड फाटा ते उसगाव -वज्रेश्वरी -आंबाडी नाका- नदीनाका - भिवंडी मार्गे इच्छितस्थळी **किंवा**
२) चिंचोटी फाटा ते कामन - अंजूर फाटा - भिवंडी मार्गे इच्छितस्थळी

यासाठी काशिमीरा वाहतूक विभाग, परिमंडळ-१ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी त्यांचेकडील जा. क्र. १६७६/२०२२, दिनांक- २९/०८/२०२२ अन्वये अवजड वाहनांना गणपती विसर्जनाच्या नमुद वेळेस पर्यायी मार्गाने वळवण्याबाबत वाहतूक नियंत्रण अधिसूचना पारित होणेबाबत विनंती केलेली आहे

**त्याअर्थी** मी विजयकांत सागर, पोलीस उपायुक्त, मुख्यालय, मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या वाहतूक विभागाचा पोलीस उपायुक्त म्हणून राष्ट्रीय महामार्गावर वाहतूक कोंडी होऊन सामान्य जनतेची, प्रवाशांची गैरसोय होवु नये व अपघात होऊ नये तसेच मा. व्हि.व्हि.आय.पी. महोदय यांची प्रवासातील सुरक्षितता अबाधित रहावी. यासाठी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३३ (१)(ब) प्रमाणे व मोटार वाहन कायदा कलम ११६(१) (अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे.

गणपती विसर्जनाचे दिनांक- ०१/०९/२०२२, दि. ०४/०९/२०२२, दि. ०५/०९/२०२२, दि. ०६/०९/२०२२ व दि. ०९/०९/२०२२ रोजी सकाळी ०५.०० वा. ते गणेशमुर्ती विसर्जन मिरवणूक संपेपर्यंत खालीलप्रमाणे प्रवेश बंद करण्यात येत आहे. तसेच दिनांक ३१/०८/२०२२ ते ०९/०९/२०२२ याकालावधीत गणपती विसर्जन दिवस सोडून इतर दिवशी जड -अवजड वाहनांना रात्रौ. २१.०० वा. ते सकाळी ०५.०० वाजेपावेता वाहतूकीस मुभा देण्यात येत आहे.

१. **प्रवेश बंद** - पालघर व गुजरात बाजुकडुन येणारी वाहनांना शिरसाड फाटा पासुन चिंचोटी व वरसावे बाजुकडे येण्यासाठी प्रवेश बंद
**पर्यायी मार्ग- शिरसाड फाटा ते उसगांव-वर्जेश्वरी -अंबाडी नाका-नदीनाका-भिवंडी मार्गे इच्छितस्थळी**

किंवा

२. **प्रवेश बंद** -पालघर- वसई बाजूकडून येणारी वाहनांना चिंचोटी नाक्यापासून वरसावे बाजूकडे येण्यासाठी प्रवेश बंद
**पर्यायी मार्ग - सदर वाहने चिंचोटी फाटा ते कामन - अंजूर फाटा- भिवंडी मार्गे इच्छित स्थळी जातील.**

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसूचना मी विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त, मुख्यालय, मिरा-भाईंदर, वसई-विरार आज दिनांक - ३१/०८/२०२२ रोजी माझ्या सही शिक्यानिशी जाहीर करत आहे.

(विजयकांत सागर)
पोलीस उप आयुक्त, मुख्यालय
मिरा-भाईंदर, वसई-विरार

प्रति,

**संचालक, शासकीय मुद्रण व लेखन सामुग्री,चर्नीरोड,मुंबई**

२/- आपणास विंनती करण्यात येते की, वरील संदर्भीय वाहतुक अधिसुचना सुधारणा केले बाबत तसेच माल वाहतुक करणाया सर्व प्रकारच्या वाहनांचे मार्गक्रमणाकरीता जारी करण्यात आलेल्या वेळेबाबत राजपत्रात प्रसिध्दी देण्यात यावी.

आवश्यक कार्यवाहीकरीता प्रत-

१. पोलीस उप आयुक्त, वाहतुक, पश्चिम उपनगरे, मुंबई
२. पोलीस अधीक्षक, रस्ता सुरक्षा महामार्ग, ठाणे
३. पोलीस उप आयुक्त, वाहतूक, ठाणे शहर
४. सहायक पोलीस आयुक्त, वाहतूक, मिरारोड, मिरा-भाईंदर वसई-विरार
५. जिल्हा माहिती अधिकारी, ठाणे जिल्हा
६. प्रभारी अधिकारी- काशिमीरा, वसई व विरार वाहतूक विभाग
प्रभारी अधिकारी - काशिमीरा, वालीव, माणिकपूर, विरार पोलीस ठाणे
७. जनसंपर्क अधिकारी, मिरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालय
८. प्रभारी अधिकारी- गणेशपूरी, भिवंडी तालूका पोलीस ठाणे व नारपोली वाहतूक विभाग